International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# मानवता, स्वातंत्र्य आणि समानता : लोकशाहीची स्थिती आणि भविष्यातील दिशादर्शन

**प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे पाटील**

*यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर*

*Corresponding Author – प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे पाटील*

**DOI - 10.5281/zenodo.18655346**

***शोधनिबंध सार*** *(Abstract):*

*"मानवता, स्वातंत्र्य आणि समानता : लोकशाहीची स्थिती आणि भविष्यातील दिशादर्शन" या संशोधनाचा उद्देश मानवतेवर आधारित लोकशाही मूल्यांची वास्तविक अंमलबजावणी, त्यातील मर्यादा आणि आजच्या सामाजिक-राजकीय बदलांच्या पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या नवीन दिशांचा शोध घेणे हा आहे. लोकशाहीची मूळ तत्त्वे—मानवी प्रतिष्ठा, समान संधी, नागरिकांचे स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि सहभाग—ही समाजातील मानवतेच्या जाणिवेशी घट्ट जोडलेली आहेत. परंतु जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा प्रभाव, वाढता धृवीकरण, आर्थिक विषमता आणि राजकीय हस्तक्षेप यांसारख्या घटकांमुळे या मूल्यांना आव्हान निर्माण झाले आहे.या अभ्यासात लोकशाहीतील मानवतेची प्रत्यक्ष स्थिती, असमानता आणि सामाजिक विषमतेचे स्वरूप, नागरिकांच्या अधिकारांचे अध:पतन, तसेच लोकशाही संरचनेतील नैतिक अधिष्ठानाचे क्षरण यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच मानवतावादी विचार, सक्षम शासनव्यवस्था, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि नागरिकजागृती यांच्या आधारे लोकशाही अधिक सर्वसमावेशक आणि मूल्याधिष्ठित कशी होऊ शकते याचे दिशादर्शन देखील प्रस्तुत केले आहे.*

*प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मानवता, स्वातंत्र्य आणि समानता या तीन मूलभूत स्तंभांच्या आधारे लोकशाहीच्या वर्तमान स्थितीचे प्रतिबिंब आणि तिच्या भविष्यातील विकासमार्गाची आवश्यक मांडणी करण्यात आली आहे.*

**Keywords: मानवता,स्वातंत्र्य, समानता,लोकशाही मूल्ये, संविधानिक तत्त्वे, मानवाधिकार,सामाजिक न्याय,अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आर्थिक विषमता,राजकीय ध्रुवीकरण,नागरी सहभाग, लोकशाही साक्षरता, समावेशक विकास,सामाजिक समता,लोकतांत्रिक संस्था,भविष्यकालीन दिशादर्शन.**

## प्रस्तावना:

मानवजातिच्या विकासप्रक्रियेत मानवता आणि लोकशाही ही दोन संकल्पना परस्परपूरक, गतिशील आणि समाजरचना घडविणाऱ्या मूलभूत शक्ती म्हणून उदयास येतात. मानवता माणसातील करुणा, समता, आदर, परस्पर सहजीवन आणि नैतिक मूल्यांचा आधार देते; तर लोकशाही नागरिकांच्या सहभागावर, अधिकारांच्या संवर्धनावर, तसेच पारदर्शक आणि जबाबदार शासनव्यवस्थेवर उभी आहे. मानवतेचे मूल्य आणि लोकशाहीचे तत्त्व यांचे नाते केवळ राजकीय संरचनेपर्यंत मर्यादित नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक जीवनव्यवहारांशी घट्ट जोडलेले आहे.

आजचा जागतिकीकरणाचा काळ व्यक्तीस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि समान संधी यांसारख्या लोकशाही मूल्यांना बळकट करतो, परंतु त्याचवेळी विषमता, संघर्ष, सांस्कृतिक धृवीकरण आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनासारख्या नव्या आव्हानांनाही आमंत्रण देतो. या पार्श्वभूमीवर मानवतेचे मूल्य अधिक अधोरेखित होते कारण लोकशाहीची

वास्तविकता केवळ संविधानिक चौकटीत नसून तिच्या संदर्भात जगणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या मानवी संवेदनांमध्ये दडलेली असते.

प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे लोकशाहीचे मूलतत्त्व, मानवतेचे अधिष्ठान, दोन्हींचे अंत:संबंध आणि आजच्या बदलत्या सामाजिक-राजकीय संदर्भात उद्भवणारी आव्हाने यांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे.

**अभ्यासाचा उद्देश:**

1. मानवता, स्वातंत्र्य आणि समानता या लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांचे तात्त्विक व संकल्पनात्मक विश्लेषण करणे.
2. आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये या मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कितपत प्रभावी आहे याचे मूल्यांकन करणे.
3. लोकशाहीतील नागरिक स्वातंत्र्य, मानवी हक्क आणि सामाजिक समतेची वर्तमान स्थिती अभ्यासणे.
4. आर्थिक, सामाजिक व राजकीय विषमतेचा लोकशाही मूल्यांवर होणारा परिणाम विश्लेषित करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ग्रंथसंपदा आधारित, विश्लेषणात्मक, तुलनात्मक आणि गुणात्मक संशोधन पद्धतींचा समन्वय वापरला गेला आहे.

**प्राचीन भारतातील लोकशाहीची बीजे:**

प्राचीन भारतातील सामाजिक आणि राजकीय रचनांचा अभ्यास केला असता, लोकशाही ही आधुनिक किंवा पाश्चात्य संकल्पना नसून तिची बीजे भारतीय परंपरेत अत्यंत खोलवर रुजलेली असल्याचे लक्षात येते. वैदिक काळापासून ते बौद्धकालीन संघव्यवस्थेपर्यंत लोकांच्या सहभागावर आधारित निर्णयप्रक्रिया, सल्लामसलत, सामूहिक विचार आणि अधिकारांचे संतुलन यांची अनेक उदाहरणे आढळतात. हीच तत्त्वे पुढे लोकशाही व्यवस्थेचे प्राथमिक आधार म्हणून विकसित झाली.वैदिक साहित्यात ‘सभा’ आणि ‘समिती’ या दोन प्रतिनिधिक संस्थांचा उल्लेख आढळतो. या संस्था केवळ राजकीय अधिकार केंद्र नव्हत्या, तर समाजातील महत्त्वाच्या निर्णयांवर चर्चा करणारी आणि शासकांना मार्गदर्शन करणारी सल्लागार मंडळी होती. ‘सभा’ ही प्रौढ, अनुभवी व्यक्तींची परिषद मानली जायची, तर ‘समिती’मध्ये व्यापक जनसमुदायाचा सहभाग असे. समाजातील कोणत्याही महत्त्वाच्या निर्णयापूर्वी या दोन्ही सभा सक्रिय होत आणि निर्णयांना लोकांची मान्यता मिळाल्यानंतरच शासन पुढे जात असे. ही पद्धत जनमताच्या आदरावर आधारित असल्यामुळे आधुनिक लोकशाहीतील ‘public consent’ किंवा ‘popular will’ यांची मूलभूत रूपे याच काळात दिसून येतात.

याच काळात स्थानिक पातळीवर जनपद, ग्रामसभा, पंचायत, ग्रामिक अशा स्वशासकीय संस्थाही अस्तित्वात होत्या. ग्रामिक किंवा ग्रामप्रमुखाची निवड अनेकदा समुदायाच्या संमतीने केली जात असे. गावाच्या पातळीवर जमीन-वाटप, जलव्यवस्थापन, वाद-विवाद निवारण, कर संकलन आणि सुरक्षा यांसारख्या निर्णयांमध्ये लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असे. या संस्था केवळ प्रशासनिक केंद्रे नसून समाजातील एकात्मता, न्याय आणि परस्पर जबाबदारी यांना पोषक ठरणारे लोकशाही-आधारित व्यवहार होते.या सर्व घटकांमधून प्राचीन भारतात लोकशाहीची बीजे अत्यंत नैसर्गिकरित्या विकसित होऊ लागली होती. लोकांचे सहभागित्व, मुक्त चर्चा, निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकता, जबाबदारी, नैतिकता, समता आणि न्याय या तत्त्वांचा प्रारंभिक अविष्कार या परंपरांमध्ये

पाहायला मिळतो. त्यामुळे लोकशाही ही भारतासाठी बाहेरून आलेली संकल्पना नसून तिचा आत्मा आणि मूल्यव्यवस्था भारताच्या प्राचीन सांस्कृतिक वारशात दीर्घकालापासून रूजलेली आहे, हे स्पष्ट होते.

**मध्ययुगीन भारतातील सामाजिक-राजकीय रचना:**

मध्ययुगीन भारताचा सामाजिक राजकीय इतिहास अत्यंत बहुपदरी, विविधतेने नटलेला आणि परिवर्तनशील स्वरूपाचा आहे. साधारणपणे ८व्या शतकापासून १८व्या शतकापर्यंतचा काळ मध्ययुगीन मानला जातो. या कालखंडात भारतीय समाजरचना, प्रशासन, न्यायसंस्था आणि सांस्कृतिक आयामांमध्ये मोठे बदल घडून आले. जरी आधुनिक अर्थाने लोकशाही संस्था अस्तित्वात नव्हत्या, तरी त्या काळातील अनेक प्रक्रिया लोकसहभाग, सल्लामसलत, न्याय, संतुलित सत्ता आणि सार्वजनिक हित यांच्या तत्त्वांना पोषक होत्या. त्यामुळे हा काळ भारतीय लोकशाहीच्या सामाजिक पायाभरणीचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो.मध्ययुगीन भारतातील सर्वात प्रभावी घटक म्हणजे पंचायत आणि स्थानिक स्वशासनाची समृद्ध परंपरा. गाव हे त्या काळातील प्रशासनाचे मूलभूत घटक होते. पंचायती केवळ वाद-विवाद सोडवणारी संस्था नसून त्या गावाच्या आर्थिक आणि सामाजिक निर्णयांचा केंद्रबिंदू होत्या. जमीन वाटप, सिंचन व्यवस्था, करनिर्धारण, सण-उत्सवांचे आयोजन, सामाजिक शिस्त राखणे या सर्व बाबींमध्ये ग्रामसभा आणि पंचायत सक्रिय भूमिका बजावत. पंचांना लोकांचा मान आणि विश्वास मिळत असे, आणि पंचायतीचे निर्णय लोकांनी मान्य करणे ही एक सामाजिक जबाबदारी मानली जाई. या स्वयंस्फूर्त संस्था लोकांमध्ये परस्पर सहकार्य, न्यायाची जाणीव आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेची संस्कृती विकसित करीत होत्या.

मध्ययुगीन भारतातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे मुघल प्रशासन. मुघल साम्राज्यात सत्तेचे केवळ केंद्रीकरण झाले नाही, तर अनेक प्रकारची सामूहिक सल्लामसलत आणि जबाबदारीची पद्धत अस्तित्वात होती. अकबर बादशहाचा काळ यामध्ये उल्लेखनीय आहे. अकबराने ‘सुलह-ए-कुल’ ही सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता आणि मानवतेची नीती स्वीकारली. त्याने विविध धर्मांतील, विचारप्रवाहांतील विद्वानांना ‘इबादतखाना’मध्ये एकत्र आणून चर्चा, संवाद आणि बौद्धिक विनिमयाची परंपरा रुजवली. ही पद्धत विविधतेचा स्वीकार आणि विचारस्वातंत्र्याचा सन्मान या मूल्यांना पोषक होती.समग्र विचार करता, मध्ययुगीन भारतातील सामाजिक राजकीय रचनेत जरी शाब्दिक अर्थाने लोकशाही नसली तरी स्थानिक स्वायत्तता, सल्लामसलत, न्यायनिष्ठा, विविधतेचे सहअस्तित्व, आणि लोकमर्यादांचा आदर ही लोकशाहीची मूलतत्त्वे आढळतात. या परंपरांनी भारतीय समाजाला सामूहिक निर्णयक्षमता, सहजीवन, सहिष्णुता आणि जबाबदार नागरिकत्वाची पायाभरणी दिली, जी पुढे आधुनिक भारतीय लोकशाहीच्या घडणीत अत्यंत महत्त्वाची ठरली.

**ब्रिटिश शासन आणि आधुनिक लोकशाहीची पायाभरणी:**

भारतातील आधुनिक लोकशाहीचा पाया हा पूर्णपणे स्वातंत्र्यानंतर घडलेला नसून त्याची बीजे ब्रिटिश वसाहतवादी कारभाराच्या काळातच रोवली गेली होती. जरी ब्रिटिश शासनाचे मुख्य उद्दिष्ट आर्थिक शोषण आणि साम्राज्यविस्तार होते, तरीही त्यांच्या प्रशासकीय सुधारणा, कायदे, राज्यव्यवस्थेतील बदल आणि शिक्षण धोरण यांमुळे भारतात आधुनिक लोकशाहीचे अनेक घटक आकार घेऊ लागले. या कालखंडाने भारतीय समाजाला नवीन राजकीय

शब्दसंग्रह, विचारधारा, संविधानवादी दृष्टिकोन आणि अधिकार कर्तव्यांची जाणीव दिली. ब्रिटिशांनी आणलेली आधुनिक कायदा प्रणाली (Indian Penal Code 1860, Evidence Act 1872, Civil & Criminal Procedure Codes) ही भारताच्या एकसंध न्यायप्रणालीची पायाभरणी ठरली. या कायद्यांनी "समान कायदा" संकल्पना रुजवली, जी स्वातंत्र्योत्तर संविधानातील न्याय आणि समानतेच्या मूल्यांची आधाररचना बनली. याच काळात इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे भारतीय समाजात आधुनिक राष्ट्रवाद, जनमत, लोकशाही-अधिकार, व्यक्तिस्वातंत्र्य, प्रेसची स्वातंत्र्य, निवडणुकांचा अधिकार असे विचार रुजले.

1857 नंतर ब्रिटिशांनी भारतीयांचा थेट कारभारात सहभाग वाढवण्यासाठी विधिमंडळांमध्ये काही जागा दिल्या. या सहभागाच्या मर्यादा अनेक असल्या तरी, भारतीय मध्यमवर्ग, वकील, शिक्षक, सामाजिक सुधारक आणि नव्या नेतृत्वाला राजकारणातील अनुभव व भाषा मिळाली. पुढे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची 1885 मधील स्थापना ही ब्रिटिश सुधारणा प्रक्रियेने निर्माण केलेल्या नव्या राजकीय जागृतीचेच फलित होते. काँग्रेसच्या माध्यमातून भारतीय समाजाने प्रथमच प्रतिनिधिक राजकारण, हक्कांची मागणी, घटनात्मक मार्गाने लढा, आणि जनतेला संघटित करण्याचे राजकीय कौशल्य आत्मसात केले. याचबरोबर, ब्रिटिशांनी लोकांना त्यांच्या हक्कांसाठी उभे राहण्याची बौद्धिक क्षमता देत असताना, त्यांच्या अन्यायकारक धोरणांनी भारतीय समाजात प्रतिकाराची शक्तीही निर्माण केली. या दोन्ही गोष्टी आधुनिक राजकीय संस्थांची ओळख आणि ब्रिटिश दडपशाहीविरुद्धचा आंदोलनात्मक आत्मभाव यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला लोकशाहीचे स्वरूप दिले. गांधी, नेहरू, तिलक, गोखले, फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी यांसारख्या नेत्यांनी याच संरचनांचा उपयोग करून जनतेला हक्कांची आणि स्वशासनाची जाणीव करून दिली.

1935 चा भारत शासन अधिनियम हा भारतीय संविधानाचा विचारात्मक पाया ठरला. केंद्र प्रांतांचे विभाजन, संघीय ढाचा, द्विसदनीय विधानमंडळ, निवडणूक व्यवस्था, जबाबदार मंत्रीमंडळ यांसारखे अनेक लोकशाही घटक या कायद्यात दिसतात. स्वातंत्र्यानंतर संविधान सभेनेही या प्रणालीतील काही तत्त्वे अंगीकृत केली. अशा प्रकारे ब्रिटिश कालखंडातील राजकीय अनुभव, न्यायव्यवस्था, निवडणुका, विधीमंडळे, नागरी मूल्यांचा प्रसार आणि आंदोलनात्मक पद्धती यांनी भारतात आधुनिक लोकशाहीची बळकट पायाभरणी केली.

**स्वातंत्र्यलढा आणि लोकशाही मूल्यांचा उदय-**

भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ परकीय सत्तेविरुद्धचा संघर्ष नव्हता; तो भारतीय समाजात लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांचा अभ्युदय घडवणारा ऐतिहासिक टप्पा होता. या लढ्याने भारतात मानवता, स्वातंत्र्य, समानता, बंधुता, न्याय, सहभाग, अहिंसा, मानवी अधिकार आणि जनशक्ती यांसारख्या मूल्यांना व्यवहारिक अर्थ दिला. ब्रिटिशांवरील प्रतिकार हा जरी केंद्रस्थानी होता, तरी लढ्याची व्यापकता भारतीय समाजात नवीन विचार आणि राजकीय संस्कृती निर्माण करणारी होती. १९व्या शतकाच्या अखेरीस उदयास आलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वातंत्र्यलढ्याला घटनात्मक स्वरूप दिले.

बाळ गंगाधर टिळकांच्या स्वराज्याच्या घोषणेने लोकशाहीच्या “स्वशासनाचा अधिकार” या तत्त्वाला जनआंदोलनाचे स्वरूप दिले. गणेशोत्सव आणि शिवजयंतीसारख्या सार्वजनिक सणांद्वारे राजकीय जागृतीचा विस्तार करण्यात आला. टिळकांनी स्वातंत्र्याची मागणी जनतेच्या हाती दिली आणि “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध

हक्क आहे" या विचाराने लोकशाहीला जनाधार मिळवून दिला. याच काळात बंगाल विभाजनविरोधी आंदोलन, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण चळवळींनी लोकांमध्ये राजकीय सहभागाची भावना वाढवली.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याने मूल्यकेंद्रित, नैतिक आणि मानवी दृष्टिकोन प्राप्त केला. गांधींनी अहिंसा, सत्य, समानता, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निर्मूलन, ग्रामस्वराज्य आणि सार्वजनिक सहभाग या लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना व्यापक जनाधार दिला. असहकार आंदोलन, नागरी अवज्ञा आंदोलन, दांडी यात्रा आणि भारत छोडो आंदोलन यांच्या माध्यमातून प्रत्येक भारतीय नागरिक लढ्याचा सक्रिय घटक बनला. अहिंसेवर आधारित संघर्षामुळे लोकशाहीचा 'नागरिक–केंद्रित' पाया बळकट झाला, ज्याने पुढे भारतीय संविधानाच्या निर्मितीतही महत्त्वाची भूमिका बजावली.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात प्रेस, साहित्य, शिक्षण, समाजसुधार चळवळी आणि सामाजिक संघटनांनी लोकशाही मूल्यांची पेरणी केली. अँनी बेझंट, लोकहितवादी, शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार, नारायण गुरु, राजाराम मोहन रॉय यांसारख्या सुधारकांनी सामाजिक समानता, शिक्षण, जातिनिर्मूलन, स्त्री-सक्षमीकरण, तसेच संघटित संघर्षाचा मार्ग दाखवला. या सुधारक चळवळींनी लोकशाहीला सामाजिक आधार दिला, ज्यामुळे शासनव्यवस्था केवळ राजकीय न राहता सामाजिक न्यायावर आधारित बनली.

**भारतीय संविधानाची निर्मिती: लोकशाहीचा शिल्पकार काळ:**

भारतीय संविधानाची निर्मिती ही भारताच्या राजकीय इतिहासातील सर्वांत महत्त्वाची आणि परिवर्तनशील प्रक्रिया होती. हा काळ भारतीय लोकशाहीच्या शिल्पनिर्मितीचा सुवर्णकाल मानला जातो, कारण याच कालखंडात विविध सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक आणि राजकीय अनुभवांचे एकत्रीकरण होऊन आधुनिक भारताच्या लोकशाही आराखड्याला आकार मिळाला. संविधान हे केवळ कायद्यांचे संकलन नसून भारताच्या संघर्षमय स्वातंत्र्यलढ्याचे विचारधन, सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा, आणि जनतेच्या हक्क कर्तव्यांचे मार्गदर्शक दस्तऐवज आहे.

संविधान निर्माणाची प्रक्रिया औपचारिक स्वरूपात १९४६ मध्ये संविधान सभेच्या स्थापनेपासून सुरू झाली. ही सभा भारतातील विविध प्रांत, देशी संस्थान, सामाजिक गट, राजकीय पक्ष, आणि सांस्कृतिक विविधतांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था होती. संविधान निर्मितीच्या या कालखंडाने भारतीय लोकशाहीचे "समावेशकता", "विविधतेत एकता", "सहमती निर्माण करण्याची क्षमता" आणि "वाद–संवादावर आधारित राजकीय प्रक्रिया" यांचे प्रत्यक्ष दर्शन घडवले. २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवसांच्या सूक्ष्म, तर्कशुद्ध आणि सखोल चर्चेनंतर भारतीय संविधानाची निर्मिती झाली ही प्रक्रिया स्वतःच लोकशाहीची जिवंत प्रयोगशाळा होती. या शिल्पकार काळात संविधान सभेने प्राचीन भारतीय परंपरा, ब्रिटिश संसदीय अनुभव, अमेरिकेचे संविधान, आयर्लंडचे मूलाधिकार, फ्रान्सचा प्रजासत्ताक विचार, कॅनडाचे संघराज्य तत्त्व, तसेच स्वातंत्र्यलढ्यातील नैतिक मानवी मूल्ये यांचा स्वतंत्र भारतीय संदर्भात अभ्यास करून सर्वोत्तम तत्त्वांची सांगड घातली. ही सांगड भारतीय परिस्थितीनुसार घडविणे हे या प्रक्रियेचे विशेष वैशिष्ट्य होते. त्यामुळे भारतीय संविधान हे कडक प्रतिरूप नसून बदलत्या समाजाला अनुकूल अशी गतिशील प्रणाली बनली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते आणि त्यांनी भारतीय लोकशाहीच्या शिल्पनिर्माणात केंद्रस्थानी भूमिका निभावली. त्यांच्या नेतृत्वाने भारतीय संविधानाला वैचारिक खोली, सामाजिक न्यायाची दृष्टी, वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण, आणि समान नागरिकत्वाची पायाभरणी दिली. त्यांनी सामाजिक लोकशाही, आर्थिक समानता, बंधुता आणि वैयक्तिक हक्कांच्या सुरक्षिततेचा आग्रह धरला. आंबेडकरांनी संविधान हे "सामाजिक परिवर्तनाचे साधन" असे मानले, त्यामुळे ते केवळ राजकीय व्यवस्थाच नव्हे तर सामाजिक समता आणि प्रतिष्ठेचा मार्गही ठरले.

भारतीय संविधानाचा स्वीकार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी झाला आणि २६ जानेवारी १९५० रोजी ते अमलात आले. या क्षणापासून भारत प्रजासत्ताक बनला आणि लोकशाही शासनप्रणालीचा आधिकारिक आरंभ झाला. संविधान हे भारताच्या भविष्याचा आराखडा बनले—मूलभूत हक्कांच्या संरक्षणापासून सामाजिक न्यायाच्या आकांक्षांपर्यंत, प्रशासनापासून नागरिकत्वाच्या मूल्यांपर्यंत, आणि राष्ट्रीय एकात्मतेपासून वैयक्तिक स्वातंत्र्यापर्यंत.

**घटना-तत्त्वांमधील मानवता, स्वातंत्र्य आणि समानतेचा आधार-**

भारतीय संविधान हे केवळ राजकीय तत्त्वांचे संकलन नाही; ते भारतीय समाजाला मानवता, स्वातंत्र्य आणि समानता या मूलभूत लोकशाही मूल्यांवर आधारित जीवनपद्धती प्रदान करणारे नैतिक–वैचारिक मार्गदर्शन आहे. मानवाच्या प्रतिष्ठेला केंद्रस्थानी ठेवून नागरिकांना अधिकार, संधी आणि न्याय देण्याचा संविधानाचा मूलभूत हेतू आहे. त्यामुळे भारतीय लोकशाहीची मुळं ही घटना-तत्त्वांमध्ये घट्ट रोवलेली आहेत आणि ही तत्त्वे आधुनिक भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाची दिशा निश्चित करतात.

मानवता, किंवा 'मानवी प्रतिष्ठा', हा भारतीय संविधानाचा आत्मा मानला जातो. प्रस्तावनेतील "सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय" ही घोषणा प्रत्येक नागरिकाच्या समान माणूस म्हणून स्वीकाराचा आधार घालते. अस्पृश्यता, जात, धर्म, लिंग, भौतिक संपत्ती, वंश किंवा जन्माच्या आधारे होणाऱ्या भेदभावाला रोकण्यासाठी मूलभूत अधिकारांचे संरचनागत जाळे तयार केले गेले. अनुच्छेद 14 ते 18 मधील समानता, अस्पृश्यता निर्मूलन, आणि पदवीविशेषांचे उच्चाटन ही तरतूद मानवतेच्या आदर्शाला मूर्त रूप देतात. "समान नागरिकत्व" आणि "मानवी प्रतिष्ठा" ही संकल्पना संविधानाच्या प्रत्येक भागात स्पष्टपणे प्रतिबिंबित होते.

स्वातंत्र्य हा भारतीय संविधानातील दुसरा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. प्रस्तावनेतील "स्वातंत्र्य" ही संकल्पना केवळ शारीरिक कारावासापासून मुक्तता नाही, तर व्यक्तीच्या विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, संघटना, प्रवास, व्यक्तित्व आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये स्वावलंबन व स्वायत्तता प्रदान करणारी आहे. अनुच्छेद 19 मधील सहा मूलभूत स्वातंत्र्ये विचार, अभिव्यक्ती, सभा, संघटना, वास्तव्य आणि व्यवसाय या नागरिकांना सक्रिय सहभागी लोकशाहीचे साधन उपलब्ध करून देतात. याच तत्त्वांमधून नागरिकांना राज्यावर प्रश्न विचारण्याचा अधिकार, आंदोलन करण्याचा हक्क, माहिती जाणून घेण्याचा अधिकार आणि शासनावर प्रभाव टाकण्याची क्षमता मिळते.

अनुच्छेद 21 मधील "प्राण आणि स्वातंत्र्याचा हक्क" हा तर भारतीय संविधानाचा सर्वांत मानवी आणि जीवनदायी घटक आहे. न्यायालयांनी या हक्काचा विस्तार करून सन्मानाने जगण्याचा हक्क, गोपनीयतेचा अधिकार, आरोग्य, शिक्षण, प्रदूषणमुक्त पर्यावरण, सुरक्षितता अशा

अनेक मानवी स्वातंत्र्यांना घटनात्मक संरक्षण दिले. अशा प्रकारे संविधानाने मानवाला केवळ जीवनच नव्हे तर "गुणवत्तापूर्ण जीवन" दिले.समानता हे भारतीय संविधानाचे तिसरे आणि निर्णायक तत्त्व आहे. भारतीय समाजातील ऐतिहासिक विषमता जातीय भेद, लैंगिक असमानता, आर्थिक असमतोल, सामाजिक वंचितता यांचे भस्मसात करण्यासाठी संविधानाने व्यापक आणि प्रगतिशील उपाययोजना केल्या. समानतेच्या तत्त्वात फक्त 'समान कायदा' नव्हे तर 'समान संधी' आणि 'समान परिणाम' यांचा समावेश आहे. यासाठी आरक्षणासारख्या प्रतिपूरक उपाययोजना, सामाजिक आर्थिक उन्नतीची कार्यक्रमे, महिला व वंचित गटांसाठी विशेष संरक्षण, आणि न्यायाच्या प्रवेशातील समानता हे उपाय संविधानात दृढपणे नोंदवले आहेत.यामुळे भारतीय संविधान स्वातंत्र्य आणि समानतेच्या समतोलावर आधारित न्यायपूर्ण समाजाच्या निर्मितीचा मार्ग दाखवते.

**स्वातंत्र्योत्तर लोकशाहीचा विकास प्रवास-**

भारताने स्वातंत्र्य मिळविल्यानंतरचा काळ हा लोकशाही व्यवस्थेचा उभारणीचा, सुदृढीकरणाचा आणि परिवर्तनाचा व्यापक प्रवास आहे. १९५० पासून आजपर्यंत भारताने विविध राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि संस्थात्मक आव्हानांना सामोरे जात लोकशाहीचा एक अनोखा, बहुविध आणि परिपक्व असा मार्ग तयार केला. स्वातंत्र्योत्तर भारतीय लोकशाहीचा अभ्यास हा जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही प्रयोगाचे विश्लेषण आहे ज्यात विविधता, दारिद्र्य, विषमता, प्रादेशिकता, भाषा, जाती, धर्म आणि वेगवेगळ्या आर्थिक वास्तवांच्या पार्श्वभूमीवरही लोकशाही टिकून राहिली आणि विकसित झाली.स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाहीचा सर्वांत महत्त्वाचा पाया म्हणजे "सार्वत्रिक प्रौढ मताधिकार". लिंग, जात, धर्म, आर्थिक स्थिती किंवा शिक्षणाच्या आधारावरील कोणत्याही भेदाशिवाय प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार देणे हा एक क्रांतिकारी निर्णय होता. विविधतेने नटलेल्या इतक्या मोठ्या देशात हा निर्णय भारतीय लोकशाहीच्या समावेशक दृष्टीकोनाची म्हणून ओळख निर्माण करतो. १९५१–५२ मधील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांनी लोकांना सक्रिय सहभागी शासनप्रणालीत सामील केले आणि लोकशाहीचा प्रवास सुरू झाला.

स्वातंत्र्यानंतर सामाजिक न्याय आणि समान संधी यांना लोकशाहीच्या केंद्रस्थानी स्थान देण्यात आले. जातीय विषमता, आर्थिक अंतर, स्त्री-पुरुष असमानता आणि प्रादेशिक दरी कमी करण्यासाठी आरक्षण धोरण, भूमिसुधार, हरित क्रांती, गरीबी निर्मूलन कार्यक्रम, शिक्षणाचा विस्तार, आरोग्य योजनांची वाढ, आणि सामाजिक कल्याणाच्या योजना राबविण्यात आल्या. सामाजिक लोकशाहीचा हा टप्पा भारतीय लोकशाहीला केवळ प्रक्रिया-आधारित न ठेवता परिणाम-आधारित बनवण्याचा प्रयत्न होता.

१९७५–७७ च्या आपत्कालीन काळाने लोकशाहीला मोठे आव्हान निर्माण केले, परंतु त्याच काळाने लोकशाहीच्या पुनरुत्थानाची शक्तीही दाखवली. लोकांनी पुन्हा लोकशाहीचा मार्ग निवडून सत्ता बदलाची ताकद प्रदर्शित केली. हे भारतीय लोकशाहीचे स्वशुद्धीकरणाचे आणि आत्मपरीक्षणाचे उदाहरण ठरले. या काळाने लोकशाही मूल्ये, मूलभूत अधिकार आणि संस्थात्मक स्वायत्तता यांचे महत्त्व नव्याने अधोरेखित केले.

१९९० नंतरचा काळ भारतीय लोकशाहीत बहुपक्षीयतेचा, संघराज्यतेचा आणि विकेंद्रीकरणाचा टप्पा ठरला. केंद्राच्या तुलनेत राज्यांच्या भूमिकेची व्याप्ती मोठी झाली. प्रादेशिक पक्ष, सामाजिक चळवळी, जात–आधारित आणि ओबीसी राजकीय जागृती, तसेच उदारीकरणाच्या आर्थिक धोरणांमुळे भारतीय लोकशाही अधिक विविध

आणि बहुकेंद्रित बनली. ७३वे आणि ७४वे संविधान दुरुस्ती कायदे करून पंचायत राज आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देणे हा लोकशाही विस्ताराचा निर्णायक टप्पा होता. यामुळे लोकशाही 'जनतेकडून' 'जनतेपर्यंत' प्रत्यक्ष पोहोचली; महिला, दलित, आदिवासी आणि दुर्बल गटांच्या राजकीय सहभागाला नवे स्थान मिळाले.

२१व्या शतकात भारतीय लोकशाहीने तांत्रिक, डिजिटल आणि माहिती आधारित युगात प्रवेश केला. माहिती तंत्रज्ञान, ई-शासन, आधार प्रणाली, डिजिटल मतदान प्रणालींचे सक्षमीकरण, RTI कायदा (माहितीचा हक्क), सामाजिक माध्यमांचा प्रभाव, आणि नागरी संघटनांचे नेटवर्क या सर्वांनी लोकशाहीच्या पारदर्शकता आणि जबाबदारीच्या प्रक्रियेला चालना दिली. नागरिकांच्या मतप्रदर्शनाच्या पद्धती बदलल्या; लोकशाही अधिक जागरूक, परस्परसंवादी आणि गतिशील झाली.

## सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांचे विस्तार आंदोलन:

स्वातंत्र्योत्तर भारताच्या लोकशाही प्रवासात सामाजिक न्यायाची संकल्पना ही केवळ धोरणात्मक उद्दिष्ट नव्हती, तर राष्ट्रनिर्मितीची मूलभूत दिशा ठरली. भारतीय समाजातील ऐतिहासिक विषमता जात, लिंग, आर्थिक स्थिती, शिक्षणातील दरी आणि सांस्कृतिक उपेक्षा यांना तोंड देत लोकशाहीने स्वतःला अधिक समावेशक बनवण्याचा प्रयत्न केला. या संघर्षातूनच विविध सामाजिक-राजकीय आंदोलनांची निर्मिती झाली, ज्यांनी मानवता, समानता आणि स्वातंत्र्य या लोकशाहीच्या मूलमंत्रांना नव्या अर्थाने आकार दिला.

भारताच्या लोकशाही मूल्यांचा विस्तार केवळ संसदीय मर्यादेत झाला नाही; तर सामाजिक चळवळी, संघटनात्मक प्रयत्न आणि जनाधिकार मोहीमा यांनी त्यास अधिक व्यापक पाया दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली सामाजिक लोकशाहीची कल्पना "स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे एकात्म अस्तित्व" ही स्वातंत्र्योत्तर काळातील बहुतेक चळवळींचा वैचारिक आधार ठरली. अस्पृश्यता निर्मूलन, दलित आंदोलन, महिला आंदोलन, ओबीसी राजकीय उदय, आदिवासी हक्क चळवळी, शैक्षणिक हक्क, पर्यावरण संरक्षण, आरक्षण धोरणांचा विस्तार इत्यादी उपक्रमांनी लोकशाहीचा सामाजिक व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढवला.

महिला हक्क चळवळीने लोकशाहीच्या विस्ताराला वेगळेच आयाम दिले. स्त्री-पुरुष समानतेसाठी केलेल्या प्रयत्नांनी शिक्षण, नोकरी, कायदेशीर संरक्षण, विवाह-विवाद कायदे, मातृत्व हक्क, सुरक्षितता, राजकीय आरक्षण यांसारख्या अनेक क्षेत्रांत सकारात्मक बदल घडवले. महिला सुरक्षेसंबंधी कायदे, 73वा-74वा घटनादुरुस्तीतील स्त्रियांचे स्थानिक स्वशासन आरक्षण हे सर्व लोकशाहीच्या सामाजिक पायाभरणीला बळकटी देणारे ठरले.

## लोकशाही संस्थांची स्थापनावाढ : संसद, न्यायालये, निवडणूक आयोग:

स्वातंत्र्योत्तर भारतीय लोकशाहीची उभारणी केवळ संविधानाच्या लेखनापुरती मर्यादित नसून ती संस्थात्मक वाढीतून अधिक मजबूत झाली. लोकशाहीचे मूल्य टिकवण्यासाठी, नागरिकांना प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी आणि शासन प्रक्रियेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व व न्याय सुनिश्चित करण्यासाठी संसद, न्यायालये आणि निवडणूक आयोग या प्रमुख संस्थांची स्थापना आणि सुदृढीकरणाचे महत्त्वपूर्ण टप्पे घडले.

**अ) संसद:** भारतीय लोकशाहीतील संसद ही केंद्रस्तरीय प्रतिनिधिक संस्थेचा आधारस्तंभ आहे. लोकसभा व राज्यसभा या द्विसदनीय व्यवस्थेमुळे विविध प्रादेशिक, सामाजिक, धार्मिक व आर्थिक गटांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले गेले. संसदेच्या माध्यमातून कायदे निर्माण करणे, बजेटची मान्यता, राष्ट्रीय धोरणांचा निर्धार, सरकारवर सतत देखरेख व प्रश्नोत्तरे यांचा प्रवास सुरू राहतो. संसदेनेच नागरिकांच्या मताचा आवाज आणि हक्कांना राष्ट्रीय धोरणात प्रत्यक्ष रूप दिले. शासकीय कार्यप्रणालीत नागरिकांचा सहभाग फक्त मतदानापुरता न राहता, संसदीय प्रक्रियेच्या माध्यमातून सतत होत राहिला, ज्यामुळे लोकशाही प्रक्रियेची खोली वाढली.

**ब) न्यायालये:** न्यायपालिका हे भारतीय लोकशाहीतील संरक्षक संस्था आहेत. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांची स्थापना संविधानाने केली, ज्यामुळे संविधानिक सर्वोच्चत्व, न्यायिक स्वायत्तता, मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणि शक्तींचे संतुलन सुनिश्चित झाले. भारतीय न्यायव्यवस्थेने सामाजिक बदलांना चालना दिली, भूतपूर्व विषमता, आर्थिक व सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी निर्णय दिले, आणि राज्याचे कार्य पारदर्शक ठेवले. न्यायालये लोकशाहीतील मूल्ये—मानवता, समानता आणि स्वातंत्र्य—सुरक्षित ठेवणारी ठरली. सर्वोच्च न्यायालयाच्या सार्वजनिक हित याचिका (PIL) या यंत्रणेने नागरिकांना प्रत्यक्ष न्याय मिळवण्याची सुविधा दिली आणि समाजातील दुर्बल घटकांचे हक्क संरक्षित केले.

**क) निवडणूक आयोग:** लोकशाहीची प्रतिष्ठा निवडणुकीच्या स्वच्छतेवर अवलंबून असते. 1950 साली स्थापन झालेल्या निवडणूक आयोगाने भारतातील निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता, निष्पक्षता, स्वतंत्रता आणि विश्वसनीयता सुनिश्चित केली. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराला प्रत्यक्ष रूप देण्यासाठी आयोगाने मतदानाची सुव्यवस्था, मतदारांची नोंदणी, मतदान प्रक्रियेतील देखरेख, पक्षांच्या नोंदणी नियमांचे पालन आणि मतमोजणीतील निष्पक्षता यावर लक्ष ठेवले. निवडणूक आयोगाच्या सक्रियतेमुळे भारतीय लोकशाहीत नागरिकांचा विश्वास आणि प्रतिनिधिक सरकाराची स्थिरता सुनिश्चित झाली.

या तीन प्रमुख संस्थांचा विकास म्हणजे भारतीय लोकशाहीला स्थिरता, पारदर्शकता आणि नागरिकांशी जवळीक देणारा प्रवास. संसदेने निर्णयक्षमतेला, न्यायालयांनी हक्कांच्या संरक्षणाला, निवडणूक आयोगाने प्रतिनिधित्व प्रक्रियेच्या स्वच्छतेला गती दिली. या संस्थांच्या माध्यमातून भारतीय लोकशाही केवळ राजकीय संरचना म्हणून नाही, तर मूल्याधिष्ठित, सहभागी, समावेशक आणि समाजाभिमुख व्यवस्था म्हणून विकसित झाली.

**सारांश:**

भारतीय लोकशाही हा केवळ शासनाची पद्धत नसून, मूल्याधिष्ठित, समावेशक आणि सहभागी सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे. तिचा इतिहास प्राचीन काळातील जनसामूहिक निर्णय प्रक्रियेपासून सुरु होऊन ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या माध्यमातून आधुनिक लोकशाहीपर्यंत विस्तारला. प्राचीन भारतातील ग्रामसभा, गणसभा, राजा सल्लागारांचे तत्त्वज्ञान यांमुळे नागरिकांचा सहभाग, सामूहिक निर्णय आणि न्यायसंकल्पना या लोकशाहीची बीजे रोवली गेली. मध्ययुगीन भारतातील सामाजिक राजकीय रचना, सामंतशाही व सत्ता केंद्रीकरण असूनही, विविध समाजघटकांमध्ये सहभाग, न्याय आणि सामूहिक जबाबदारी या तत्त्वांचे स्वरूप स्पष्ट झाले.

ब्रिटिश शासनाच्या काळात आधुनिक विधीव्यवस्था, प्रशासकीय ढांचा, प्रतिनिधिक संस्था, शिक्षण व जनमत प्रसार यामुळे भारतीय समाजात लोकशाही मूल्यांची पायाभरणी झाली. स्वातंत्र्यलढ्यातील

चळवळींनी अहिंसा, सत्य, समानता, बंधुता आणि नागरिक हक्क यांचे व्यवहारिक रूप भारतीय लोकशाहीला दिले. टिळक, गांधी, नेहरू, गोखले, आंबेडकर यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली जनतेने अधिकारांची, सहभागाची आणि स्वशासनाची जाणीव विकसित केली.

भारतीय संविधानाची निर्मिती हा लोकशाही शिल्पकार काळ होता. संविधानाने मानवता, स्वातंत्र्य आणि समानता या मूल्यांवर आधारित मूलभूत अधिकार, सामाजिक न्यायाचे मार्गदर्शक तत्त्वे, संघराज्य रचना, निवडणूक प्रणाली, स्वतंत्र न्यायपालिका आणि सशक्त संस्थात्मक व्यवस्था घडवली. या घटनात्मक तत्त्वांमुळे भारतीय लोकशाही मूल्याधिष्ठित आणि सर्वसमावेशक झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोकशाहीचा विकास सतत चालला. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, संसदीय प्रणाली, न्यायालयीन संरक्षण, निवडणूक आयोगाचे स्वतंत्र संचालन, सामाजिक न्यायाची चळवळी, महिला, दलित, आदिवासी आणि आर्थिक दुर्बल घटकांचे अधिकार—या सर्व घटकांनी लोकशाहीचा विस्तार आणि सखोलता वाढवली. सामाजिक न्यायासाठीच्या चळवळींनी समानता, प्रतिनिधित्व, शैक्षणिक व आर्थिक संधी यांचा आधार दिला, तर विविध संस्थांनी लोकशाही प्रक्रियेला बळकटी, पारदर्शकता आणि स्थिरता दिली.

**संदर्भ (References):**


1. ऑस्टिन, ग्रॅनव्हिल. द इंडियन कॉन्स्टिट्यूशन: कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, 1966.
2. चंद्र, बिपन. इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स. पेंग्विन बुक्स इंडिया, 1988.
3. बासु, डी.डी. इंट्रोडक्शन टू द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया. लेक्सिसनेक्सिस, 2020.
4. ब्रास, पॉल आर. द पोलिटिक्स ऑफ इंडिया सिन्स इंडिपेंडन्स. केम्ब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, 1994.
5. नूरानी, ए.जी. कॉन्स्टिट्युशनल क्वेश्चन्स इन इंडिया. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, 2013.
6. कश्यप, सुभाष सी. आवर पार्लियामेंट. नॅशनल बुक ट्रस्ट, 2010.
7. भार्गव, राजीव (संपादित), पॉलिटिक्स अँड एथिक्स ऑफ द इंडियन कॉन्स्टिट्यूशन. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, 2008.
8. भारतातील निवडणूक आयोग, जनरल इलेक्शन्सवरील सांख्यिकी अहवाल (1951–2020).
9. भारत सरकार, इंडियन कॉन्स्टिट्यूशन. लॉ अँड जस्टिस मंत्रालय, 1950.
10. जयपाळन, एन. इंडियन पॉलिटिकल सिस्टिम. अटलांटिक पब्लिशर्स & डिस्ट्रिब्यूटर्स, 2010.